# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २२/०१/२०२४

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती<br><br>अपक्र.८२/ २४ कलम- ४५७,३८० भादवी | प्रत्रकार कॉंलनी अमरावती | गु.घटना ता व वेळ दि.२०.१..२ ०२४ चे ११.०० वा ते १२.३० माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ दि.२१.१.२० २४ चे १६.३३वा | अभिजीत दिलीपराव सव्वालाखे वय ३५ वर्ष,रा.पत्राकार कॉंलनी अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आँफिस मधे गेला व आंफिस बंद करुन घरी परत आले व दि.२१/०१/२४ चे सकाळी ०८.०० वा.सुमारास फिर्यादी यांचे आतेबहीन हीने फोन करुन सांगीतले की,आँफीसचे दाराला लागलेला कुलुप कोंडा तुटलेला आहे असे चोरी झाल्याचे समजले अशा माहीती वरुन फिर्य़ादी आँफिस मध्ये आले असता आँफीस मध्ये ठेवलेले २५० फुट वायर १०एम एम की.अंदाजे ७५०/-रु. व नळीचे मीटर की.अंदाजे ४००/-रु.असा एकुण ११५० /-रु.चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ०१ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र. ८३/२४ कलम-३८० भादवी | सहकार नगर अमरावती | गु.घटना ता व वेळ दि.१९.१..२०२४ चे ११.०० वा. माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ दि.२१.१.२०२४ चे १९.५२वा | मनिष गौपालदास उधवाणी वय ३९ वर्ष,रा. सहकार नगर अमरावती | संशयीत १)कामवाली बाई २)व तिची मुलगी ३) एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पत्नीसह लग्नाला गेलो असता फिचे पत्नीने सोन्याचे दागिणे त्यामध्ये एक डायमंडचा हार कि.१,००,०००/-रु, दोन सोन्याचे हार सेट वजन ४०,ग्रॅम ,एक छोटे मंगळसुत्र डायमंड,एक मोठे मंगळसुत्र सोन्याचे वजन २० ग्रॅम ,पाच सोन्याचे चैन वजन ५० गॅ्म ,तिन सोन्याचे ब्रॅासलेट वजय ५० गॅ्म ,०७ सोन्याच्या बांगळया वजन ७० गॅ्म, १० लहान सोन्याच्या अंगठ्या वजन २० ग्रॅम ,तिन सोन्याचे लॉकेट ,वजन १० ग्रॅम,दोन सोन्याच्या मोठ्या अंगठी १५ग्रॅम,०४ सोन्याचे कानातले वजन १०ग्रॅम,एक डायमंड सेट कानातले असा एकुण २०,०००००/-रुचा माल एका खाकी रंगाच्या कापडाच्या थेल्ली मध्ये ज्यावर तनिश असे लिहले होते सदरची पिशवी हि लाकडी कपाटाला कुलुप लावुन चाबी दुस-या कपाटामध्ये ठेवली दुस-या दिवशी दुपारी २/३० वा दरम्यान घरातिल कामाकरिता संशयीत नं.१-२ ह्या आल्या होत्या त्यावेळी फिचे पत्नी घरी हजर होती त्यानंतर फिची पत्नी दुपारी ०३/००वा मार्केटला गेली व घरातिल कामे करुन संशयीत दुपारी ३/१५ वा निघुन गेल्या त्याच दरम्यान फिचे पत्नीची मेत्रिन ,संशयीत नं. ३ हि त्या रुमध्ये येवुन गेली होती फिची पत्नी ५/३० वा घरी परत आली तर फिचे दोन्ही मुल घरी होती तेव्हा फिची पत्नी पुन्हा कार्यक्रमाला जाणे असल्याने तिने दागिने घालणेकरिता कपाट उघडले तेव्हा तिने ठेवलेली दागिण्याची थैली दिसली नाही जाण्यापुर्वी फिचे पत्निने कपाटाला कुलुप लावुन ति चाबी दुसरे कपाटामध्ये ठेवली होती चाबी कोठे ठेवतात हे कामवाल्या बाईला माहीती असते तसेच फिचे पत्निची मैत्रीन त्या रुममध्ये येवुन गेली होती त्यामुळे वरिल तिन्ही लोकांनवर फिचा संशय आहे अशा फिचे जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा नोंद |

## ➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | राजापेठ अप क्र ५१/२०२४ कलम ३७९ भादवी | सुतगीरनी ग्राउंड गोपाल नगर जवळ अमरावती | घ.ता.वेळ दि.२०/०१/२०२४चे ०९/५०वा दा.ता.वेळ.दि.२१.०१/२०२४चे २३/१०वा. | रवीन्द्र विश्वनाथ हरमकर वय ५४ रा.ह.मु भाजी बाजार ,सराफा लाईन अमरावती | अज्ञात | गुन्हयाची थोडक्यात हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घ.ता.वेळी. व ठिकाणी फिर्यादी यांचा मुलगा प्रणव हरमकर व त्याचा मित्र असे फिर्यादी यांचे होन्डा शाईन टु व्हिलर गाडि क्र एम एच २७ ए के ४७४० ने क्रिकेट खेडण्याकरीता सुतगीरनी ग्राउंड गोपाल नगर जवळ अमरावती येथे गेले व गाडी लॉक करुन क्रिकेट खेडत असतांना यातील नमुद अज्ञात आरोपी फिर्यादिची गाडी घेवुन जातांना फिर्यादिचे मुलाला दिसला असता त्याने मित्राच्या गाडिने अज्ञात आरोपी चा पाठलाग केला असता मीळुन आला नाही फिर्यादिची होन्डा शाईन टु व्हिलर गाडि क्र एम एच २७ ए के ४७४०कि.अ.२०,०००रु/- इंजीन क्र जे सी ३६इ ०१९१२०६, चेसीस क्र एम इ ४जे सी ३८५सी ए ८१०१५४७ ग्रे रंगाची अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फि.चे जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे वलगाव अप क्र.- 25/2024कलम 279, 338, 427 | नांदुरा अकोला रोड नंदकिशोर गवरोहाट यांचे | दि. 20/01/2024 रोजी सायंकाळी 18/00 वा दरम्यान | दिप धनंजय अग्रवाल वय 19 वर्ष शिक्षण, जात मारवाडी, रा. मु. पो. नांदुरा बु. ता. जि. अमरावती | गौरव शेळके वय 24 वर्ष रा. नया अकोला ता. जि. अमरावती टुव्हीलर सी.डी.हनरेड | हकिकत अशा प्रकारे आहे की जबानी रिपोर्ट पो.स्टे. वलगाव अम. शहर दि. 21/01/2024 नाव – दिप धनंजय अग्रवाल वय 19 वर्ष व्य. शिक्षण, रा. मु. पो. नांदुरा बु. ता. जि. अमरावती मी समक्ष पो.स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देतो कि, वरिल पत्त्यावर वडील धनंजय अग्रवाल वय 53 वर्ष व आई यांचे सोबत राहतो व सध्या बी.कॉम सेकंड ईअर, केशरबाई लाहोटी कॉलेज अमरावती येथे शिक्षण घेत आहे. काल दि. 20/01/2024 रोजी सायंकाळी 06/00 वा दरम्यान नांदुरा येथिल आमच्या शेतातुन पप्पा सोबत त्यांच्या टि.व्ही.एस स्टार सिटी कंपनीच्या टुव्हीलर गाडी क्र. एम एच 27 एबी 3868 ने घरी जात असताना नंदकिशोर गवरीहार यांच्या शेताजवळ टर्निंग |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भादवि सह कलम 134, 177 मो वा का प्रमाणे दाखल | शेताजवळ | दाखल दि.21/01/2024 चे 16/31 वा. | | काळया रंगाची गाडीचा चालक | साईडला वळण घेताना, आमच्या समोर एक टुव्हीलर सी.डी.हनरेड काळया रंगाची गाडी चुकीच्या दिशेने समोरुन आली. त्यावर तीन लोक होते त्यांची नाव पुढील प्रमाणे 1) चालक गौरव बबनराव शेळके, 2) निलेश शेळके यांचे आई वडील (नाव माहीत नाही ). असे होते. गौरव शेळके गाडी चालवत होता. गौरव च्या गाडीला नंबर प्लेट नव्हती. एकदम रॉंग साईडने येवुन त्याने आमच्या गाडीला समोरुन धकड दिली. त्यावेळी पप्पा गाडी चालवत होते व मी मागे बसलो होतो. त्या धडकेमुळे माझे पप्पा गाडीवरुन खाली पडले. त्यांच्या उजव्या पायाला जबर मार बसला. तसेच कपाळावर मार लागला. पप्पा गाडीवरुन पडताच मी शेजारच्या शेतातल्या निवास नागपुरे काकाला मदतीसाठी आवाज दिल्याने ते लगेच आले. गौरव शेळके आम्हाला कुठलीही मदत न करता त्याच्या काका काकु सोबत गाडीने तिथुन लगेच पळुन गेला. मी चिंटु उर्फ सौरभ किरक्टे दादाला फोन लावुन पप्पाच्या अपघाताबद्दल सांगितले. ते दादा अपघाताच्या ठिकाणी आले. मी घरची फोर व्हीलर घेण्यासाठी घरी गेलो व मोठी गाडी घेवुन अपघाताच्या ठिकाणी आलो आणि पप्पा ला घेवुन मी, निवास नागपुरे व सौरभ किरक्टे असे लुंगे मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पीटल, शेगाव नाका अमरावती येथे गेलो. पप्पाला डॉक्टरांनी उपचारासाठी भर्ती केले. सध्या त्यांच्यावर तिथे उपचार सुरु आहे. काल आम्ही सगळे पप्पा जवळ असल्याने आज रिपोर्ट देण्याकरीता पोलीस स्टेशनला आलो आहे. गौरव शेळके वय 24 वर्ष रा. नया अकोला ता. जि. अमरावती याने चुकीच्या दिशेने गाडी चालवुन आमच्या गाडीला समोरुन धडक देऊन पप्पाना जबर जखमी केले व तिथुन पळुन गेला. तसेच आमच्या गाडीचे नुकसान सुद्धा केल्याने त्याचे विरुद्ध योग्य ती कायदेशिर कार्यवाही व्हावी म्हणुन त्याचे विरुद्ध मी तक्रार देत आहे. हाच माझा जबानी रिपोर्ट आहे माझे सांगणेप्रमाणे मराठीत लॅपटॉप वर टाईप करुन प्रिंट काढुन वाचुन पाहीला. बरोबर आहे. अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे राजापेठ अप क्र ५०/२४ कलम २९४,३२३, ५०४,५०६ ब,३४ भादवी | हॉटेल किचन ३६५ समोर गणपती नगर ,जुना बायपास रोड अमरावती | घ.ता.वेळ दि.१५/०१/२०२४चे १९/१७वा ते २१/०० वा दरम्यान दा.ता.वेळ.दि .२१.०१/२०२४चे१६.३३ वा. | निखील विकास अळसपुरे वय २९ रा.गोदावरी कॉलनी लॉर्ड हॉटेल्स चे लाईनमध्ये जुना बायपास रोड अमरावती | १.हॉटेल मालक महेश छाबडा २. बाउन्सर महेश खोडे +२ बाउसर | गुन्हयाची थोडक्यात हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घ.ता.वेळी. व ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र हॉटेल मीर्ची येथे जेवन करण्याकरीता पायदळ जात असतांना फिर्यादी यांनी हॉटेल किचन ३६५ च्या पार्किग मध्ये गाड्या अस्तव्यस्त लावल्याबाबत पोलीसांना फोन करुन तक्रार केल्याच्या कारणावरुन यातील वर नमुद आरोपीतांनी संगणमताने फिर्यादीला बघुन अश्लिल शीवीगाळ करुन सर्वानी मीळुन लाता भुक्कयानी बेदम मारहान केली व जीवाने मारण्याची धमकि दिली. अशा फिर्यादिचे जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |